**Publication**: Mathrubhumi
**Date:** 26.02.2017
**Page no:** 04
**Language:** Marathi

# पारदर्शी व्यवहारासाठी डिजिटल असेट आणि ब्लॉकचेन फाउंडेशनची स्थापना

बिटकॉइन ,स्टार्टअप झेबपे ,अंकोईन ,कॉइनसेक्युअर आणि सर्चट्रेड या कंपन्यांनी संयुक्त रित्या अलीकडेच डिजिटल असेट आणि ब्लॉकचेन फाउंडेशन इंडिया (DABFI)ची स्थापना केली असून चलन बाजारपेठेत वास्तविक आणि पारदर्शी वाढ व्हावी हा या फाउंडेशनचा उद्देश आहे . आतंरराष्ट्रीय कायदेक्षेत्राशी संलग्न असलेले निशित देसाई यांची फाउंडेशनच्या सल्लागार पदी नेमणूक करण्यात आली असून चलन उद्योगाला स्वयं शिस्त लावण्याचा आणि त्याद्वारे हा उद्योग वाढीस लावण्याचा देसाई प्रयत्न करणार आहेत . या फाउंडेशनच्या मुख्य कार्यकारी अध्यक्षपदी झेबपे चे सौरभ अग्रवाल यांची नेमणूक करण्यात आली असून फाउंडेशनच्या इतर सहभागी सदस्यामध्ये संदीप गोएंका झेबपे ,मोहित काल्रा कॉइनसेक्युअर ,सात्विक विश्वनाथ अंकोईन ,हरीश बी ,व्ही अंकोईन आणि विशाल गुप्ता सर्च ट्रेंड ,रश्मीच्या गुप्ता सर्च ट्रेंड यांचा समावेश आहे . सदर संस्थेच्या माध्यमातून अर्थ साक्षरता आणि भारतीय बाजारपेठेत ब्लॉकचेन आणि बिटकॉइन ला बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार असून ,संस्थेचा हा प्रवास डिजिटल चलनव्यवस्थेच्या दिशेने असणार असल्याचे सूतोवाच सौरभ अग्रवाल यांनी या प्रसंगी केले .